महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २८ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २१२ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# मेट्रो लाईन ८ ला मंत्रिमंडळाची मंजुरी

## विमानतळ जोडणी प्रकल्पाला गती



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडणाऱ्या मेट्रो लाईन ८ प्रकल्पास मान्यता देण्यात आली. यासोबतच समृद्धी महामार्गाच्या विस्तारित कामाला गती देण्याचे निर्देशही मंत्रिमंडळाकडून देण्यात आले आहेत. मेट्रो लाईन ८ साठी भूसंपादनासह विविध प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीची कामे पुढील ६ महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या मेट्रो मार्गाची एकूण लांबी सुमारे ३५ किलोमीटर असणार असून त्यापैकी ९.२५ किलोमीटर मार्ग भूमिगत, तर २४.६३६ किलोमीटर मार्ग उन्नत स्वरूपाचा असणार आहे. या मार्गावर एकूण २० स्थानके प्रस्तावित असून त्यापैकी ६ स्थानके भूमिगत आणि १४ स्थानके उन्नत असणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ स्थानक ते घाटकोपर पूर्वपर्यंतचा मार्ग भूमिगत असणार असून घाटकोपर पश्चिम स्थानक ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ स्थानकापर्यंतचा मार्ग उन्नत स्वरूपाचा असणार आहे. दोन स्थानकांमधील सरासरी अंतर सुमारे १.९ किलोमीटर ठेवण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३०.७ हेक्टर भूसंपादनाची आवश्यकता असून त्यासाठी अंदाजे ३८८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. संपूर्ण प्रकल्पासाठी एकूण २२ हजार ८६२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून हा प्रकल्प पुढील ३ वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्यापूर्वी सर्व आवश्यक परवानग्या प्राप्त करून घेण्याचे निर्देशही मंत्रिमंडळाने दिले आहेत.

---

## संपादकीय

### सत्तास्थापनेपेक्षा स्थैर्य महत्त्वाचे

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सत्तास्थापनेची लगबग सुरू होते, हे नवे नाही. आकडेमोड, युती-आघाड्या, गटनिर्मिती आणि पदांच्या वाटपात राजकीय ऊर्जा खर्ची पडते. मात्र या साऱ्या प्रक्रियेत एक मूलभूत बाब अनेकदा दुर्लक्षित राहते—ती म्हणजे प्रशासकीय आणि राजकीय स्थैर्य. सत्तास्थापना ही तात्कालिक गरज असली, तरी शहरांच्या विकासासाठी स्थैर्य ही दीर्घकालीन आवश्यकता आहे. महापालिकांमध्ये बहुमत मिळवणे हे लोकशाहीचे एक अंग आहे; परंतु मिळालेल्या बहुमताचा उपयोग करून शहर कारभार सुरळीत चालवणे, निर्णयक्षम प्रशासन उभे करणे आणि नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे, हे अधिक महत्त्वाचे आहे. सततच्या राजकीय हालचाली, गटफोडीच्या चर्चा, पदांसाठीची अंतर्गत स्पर्धा यामुळे महापालिकेचे मूळ कामकाज बाजूला पडते. परिणामी, विकासकामे रखडतात आणि नागरिकांचा प्रशासनावरचा विश्वास डळमळीत होतो.

निवडणुकीत जनतेने दिलेला कौल हा केवळ सत्ता उपभोगण्यासाठी नसतो, तर जबाबदारी स्वीकारण्यासाठी असतो. स्थिर सत्ताकेंद्र असेल, तरच दीर्घकालीन विकास आराखडे, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि नागरी सेवांमध्ये सातत्य राखता येते. अन्यथा प्रत्येक निर्णय राजकीय समीकरणांच्या कचाट्यात अडकतो. आज महापालिकांसमोर आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि वेळेत निर्णय घेण्याचे मोठे आव्हान आहे. यासाठी सत्ताधारी आणि विरोधक—दोघांनीही लोकहिताला केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. सत्तेच्या खेळीपेक्षा शहराच्या भवितव्याची चिंता अधिक महत्त्वाची आहे, हे राजकीय नेतृत्वाने ओळखले पाहिजे. शेवटी, लोकशाहीत सत्ता बदलू शकते; मात्र नागरिकांच्या अपेक्षा बदलत नाहीत. त्यामुळे सत्तास्थापनेपेक्षा स्थैर्य महत्त्वाचे, हे वास्तव स्वीकारून महापालिकांनी विकास, प्रशासन आणि लोकहित यांना प्राधान्य दिले, तरच निवडणुकांचा खरा अर्थ साकार होईल. रा

जकीय स्थैर्य नसल्यास प्रशासन केवळ आदेशांवर चालते, धोरणांवर नाही. प्रत्येक निर्णयामागे बहुमताची भीती असेल, तर विकासकामांना गती मिळत नाही. महापालिकांमधील अंतर्गत संघर्षाचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसतो. त्यामुळे सत्तेच्या आकडेमोडीपेक्षा शहराचा दीर्घकालीन विकास आराखडा महत्त्वाचा ठरतो. लोकांनी दिलेला कौल हा सत्तेसाठी नव्हे, तर सक्षम आणि स्थिर कारभारासाठी असतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

---

# ठाणे महापालिकेचा महापौर कोण?

## 3 फेब्रुवारीला निवडणूक ● सात उमेदवारांचा संघर्ष

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**




**ठाणे** : ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर आता महापौर पदाच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेना (शिंदे) कडून महापौर पदासाठी ३० जानेवारी रोजी अर्ज दाखल केले जाणार असून ३ फेब्रुवारी रोजी महापौर पदाची निवडणूक होणार आहे.

ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) ने ७५ जागांवर विजय मिळवला आहे. तसेच अपक्ष नगरसेविका प्रमिला केणी यांनीही सत्ताधारी गटाला पाठिंबा दिल्याने संख्याबळ ७६ वर पोहोचले आहे. त्यामुळे एकहाती सत्ता स्थापन करण्यात शिवसेना (शिंदे गट) यशस्वी ठरली आहे. मागील आठवड्यात महापौर पदासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले असून हे पद अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. या आरक्षणानुसार शिवसेना (शिंदे गट) कडून महापौर पदासाठी ७ इच्छुकांची नावे पुढे आली आहेत. या सातपैकी कोणाच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब होणार, याकडे राजकीय वर्तुळासह नागरिकांचेही लक्ष लागले आहे.

महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज ३० जानेवारी रोजी दाखल केले जाणार असून ३ फेब्रुवारी रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. बहुमताच्या जोरावर शिवसेना (शिंदे गट) कडूनच महापौर निवडला जाणार, हे निश्चित मानले जात आहे. मात्र सातपैकी कोणाला संधी मिळणार, हे पक्षाच्या अंतिम निर्णयावर अवलंबून असणार आहे.

**■ महापौर पदासाठी इच्छुक उमेदवार**

शिवसेना (शिंदे गट) कडून महापौर पदासाठी पुढील नगरसेवकांची नावे चर्चेत आहेत. यामध्ये प्रभाग ३ (अ) पद्मा भगत, प्रभाग ६ (अ) वनिता घोगरे, प्रभाग ७ (अ) विमल भोईर, प्रभाग ९ (अ) गणेश कांबळे, प्रभाग १६ (अ) डॉ. दर्शना जानकर, प्रभाग २४ (अ) आरती गायकवाड आणि प्रभाग २८ (अ) दीपक जाधव यांचा समावेश आहे.

या सातपैकी कोण महापौरपदाची माळ घालणार, याचा निर्णय लवकरच स्पष्ट होणार असून त्याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागून राहिले आहे.

---



# मलंगगड फ्युनिकुलर ट्रेनला उत्स्फूर्त प्रतिसाद

**आठ दिवसांत ३६ हजारांहून अधिक भाविकांचा प्रवास**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**

**अंबरनाथ** : अंबरनाथ तालुक्यातील प्रसिद्ध मलंगगडावर नुकतेच लोकार्पण झालेल्या फ्युनिकुलर ट्रेनला भाविक व पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. लोकार्पणानंतर अवघ्या ८ दिवसांत ३६ हजारांहून अधिक प्रवाशांनी या फ्युनिकुलर ट्रेनचा प्रवास केला असून, शनिवार ते सोमवार या सलग ३ दिवसांच्या सुट्ट्यांमध्येच तब्बल २७ हजार प्रवाशांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. त्यामुळे प्रकल्प संचालक कंपनीला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळाल्याचे चित्र आहे.

हिंदू आणि मुस्लिम बांधवांचे श्रद्धास्थान असलेले मलंगगड हे अंबरनाथ तालुक्यातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र आहे. निसर्गरम्य डोंगररांग, आव्हानात्मक चढाई आणि गडाच्या टोकावरून दिसणारा विस्तीर्ण परिसर पर्यटकांना नेहमीच आकर्षित करत आला आहे. धार्मिक महत्त्वामुळे येथे गेल्या अनेक वर्षांत विविध सुविधा उभारण्यात आल्या आहेत. पूर्वीची दगडी व डोंगराळ पायवाट आता खांदकी दगडी बांधकामामुळे तुलनेने सोपी झाली असली, तरी भाविकांना सुमारे ३ हजार पायऱ्या चढून गड गाठावा लागत होता.

भाविकांचा प्रवास अधिक सुलभ व्हावा यासाठी मलंगगडावर फ्युनिकुलर ट्रेन सुरू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात या प्रकल्पाला मंजुरी मिळाली; मात्र त्यानंतर विविध कारणांमुळे हा प्रकल्प अनेक वर्षे रखडला. काम अनेकदा सुरू-थांबले. दोन वर्षांपूर्वी डबे बसवण्यात आल्याने प्रकल्प लवकर पूर्ण होईल, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात सेवा सुरू होण्यास विलंब झाला. अखेर गेल्या आठवड्यात छोटेखानी कार्यक्रमात या फ्युनिकुलर ट्रेनचे लोकार्पण करण्यात आले आणि सेवा भाविकांसाठी खुली करण्यात आली. या सुविधेमुळे पूर्वी सुमारे ९० मिनिटांचा पायी प्रवास आता अवघ्या १० मिनिटांत पूर्ण होत आहे. यासाठी १५० रुपये तिकीट आकारले जात असून, या सेवेचा लाभ घेत भाविक आणि पर्यटक मोठ्या संख्येने मलंगगडावर दाखल होत आहेत. या ट्रेनमुळे मलंगगड पर्यटनाच्या नकाशावर अधिक ठळकपणे अधोरेखित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---




## महत्वाचे

### आम्हाला गटफोडीची गरज नाही - दिपेश म्हात्रे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● दि. २७**

**ठाणे** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवक गटांची अधिकृत नोंदणी प्रक्रिया आज पार पडली. यावेळी महापालिकेत एकही अपक्ष नगरसेवक निवडून आलेला नसल्याने कोणत्याही प्रकारची तोडफोड किंवा गटफोडीचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे भाजपचे नगरसेवक दिपेश म्हात्रे यांनी स्पष्ट केले. कल्याण-डोंबिवली महापालिकेत महायुतीचे एकूण १०३ नगरसेवक निवडून आले असून, त्यामध्ये भाजपचे ५० नगरसेवक आहेत. महापालिकेत गटस्थापनेच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असून, महायुतीच्या वतीने भाजपचे नगरसेवक दिपेश म्हात्रे यांनी गटनोंदणीसाठी हजेरी लावली. यावेळी महिलांसह एकूण ५० नगरसेवक उपस्थित होते. यासंदर्भात माध्यमांशी बोलताना दिपेश म्हात्रे यांनी सांगितले की, महायुतीकडून नियोजित वेळापत्रकानुसार गटस्थापनेसाठी आवश्यक उपस्थिती नोंदवण्यात आली आहे. तसेच पालिकेत अपक्ष नगरसेवक नसल्याने कोणत्याही प्रकारच्या तोडफोडीचा प्रश्नच निर्माण होत नसल्याचे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले.

### मंत्रिमंडळ कामकाजावर जि.प. निवडणुकांचा प्रभाव

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**

**मुंबई** : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निवडणूक प्रक्रियेचा प्रभाव दिसून आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह काही कॅबिनेट मंत्री विविध निवडणूकविषयक जबाबदाऱ्यांमुळे उपस्थित राहू शकले नाहीत. महापालिकांकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर दि. २४ जानेवारी रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली होती. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोस दौऱ्यावर गेले होते. दावोस दौरा पूर्ण करून परतल्यानंतर मंगळवारी मंत्रालयात पुढील मंत्रिमंडळ बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह एकूण २१ मंत्री उपस्थित होते. दरम्यान, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका सुरू असून, अनेक मंत्री प्रचार कामकाजात सक्रिय आहेत. त्यामुळे काही मंत्री मंत्रालयीन कामकाजासोबत निवडणूक जबाबदाऱ्या सांभाळत असल्याचे चित्र आहे.

---

# प्रलंबित मागण्यांसाठी अंगणवाडी सेविकांसह महिला-बाल विकास कर्मचारी आक्रमक !

**२ फेब्रुवारीपासून टप्प्याटप्प्याने आंदोलनाचा इशारा !**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**



**ठाणे** : विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अंगणवाडी सेविकांसह महिला व बाल विकास विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आंदोलनाची हाक दिली आहे. येत्या २ फेब्रुवारीपासून या आंदोलनाला सुरुवात होणार असून, टप्प्याटप्प्याने आंदोलन तीव्र केले जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली.

महिला व बाल विकास विभागामार्फत ग्रामीण व शहरी भागात एकात्मिक बालविकास सेवा योजना तसेच महिलांसाठी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जाते. यामध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके, विधी संघर्षग्रस्त बालके, कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिला, निराधार व निराश्रित महिला, देहव्यापारातून शोषित महिला, हुंडा व बालविवाह प्रतिबंध, बाल संरक्षण व बाल विकास, भिक्षेकरी पुनर्वसन आदी महत्त्वाच्या योजनांचा समावेश आहे.

मात्र या विभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच अंगणवाडी सेविकांच्या अनेक सेवा व आस्थापना विषयक मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, एकत्रित आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास विभाग राजपत्रित अधिकारी संघटना व इतर संलग्न संघटनांच्या वतीने राज्यभरातील प्रत्येक जिल्ह्यात २६ जानेवारी रोजी एकाच वेळी संबंधित मंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

त्यानुसार उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांना संघटनांच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. यावेळी शिंदे यांनी निवेदनाला सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागास आवश्यक सूचना दिल्या जातील, असे आश्वासन दिल्याची माहिती संघटनांच्या वतीने देण्यात आली आहे.

---

# बेपत्ता नगरसेवकांचे पोस्टर लावणाऱ्या उबाठा उपविभाग प्रमुख रमेश तिखेंचा मृत्यू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २७**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील उबाठा गटाचे नवनिर्वाचित नगरसेवक बेपत्ता असल्याचे पोस्टर लावणारे उबाठा उपविभाग प्रमुख रमेश तिखे यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे. मात्र, पोलिसांकडून करण्यात आलेल्या कथित दबावामुळेच तिखे यांचा मृत्यू झाल्याचा गंभीर आणि खळबळजनक आरोप उबाठाने केला आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय घडामोडींना वेग आला असतानाच हा प्रकार घडला आहे.

उबाठा गटाचे नगरसेवक मधुर म्हात्रे, कीर्ती ढोणे, राहुल कोट आणि स्वप्निल केणे हे संपर्कात नसल्याचा दावा करत उबाठा पदाधिकाऱ्यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात नगरसेवक बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती.

या पार्श्वभूमीवर उबाठा कार्यकर्त्यांनी शहरातील विविध भागांत चार नगरसेवक बेपत्ता असल्याचे पोस्टर लावले होते. या पोस्टर मोहिमेत उपविभाग प्रमुख रमेश तिखे यांचा सहभाग होता. दरम्यान, नगरसेवक मधुर म्हात्रे यांच्या वडिलांनी माझा मुलगा धार्मिक यात्रेवर गेला असून तो बेपत्ता नसल्याचे स्पष्ट केले. तसेच, त्यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात मानहानीची तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी रमेश तिखे यांच्यासह काही उबाठा कार्यकर्त्यांविरोधात मानहानीचा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर पोलिसांकडून वारंवार पोलीस ठाण्यात बोलावून मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. उबाठा जिल्हाप्रमुख शरद पाटील आणि युवासेना पदाधिकारी नीरज दुबे यांनी पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला आहे. "रमेश तिखे यांना सतत पोलीस ठाण्यात बोलावले जात होते. या मानसिक दबावामुळेच त्यांना हृदयविकाराचा झटका आला," असा आरोप त्यांनी केला. या प्रकरणात तक्रारदार उमेश म्हात्रे आणि संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात आली आहे.



# हॉली क्रॉस शाळेतील ५५ विद्यार्थिनींचा सलग स्केटिंगचा विक्रम



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण** : 77 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त कल्याण मधील हॉली क्रॉस शाळेतील 55 विद्यार्थिनींनी सलग 1 तास 26 मिनिटे 26 सेकंद स्केटिंग करून विक्रम केला. या प्रसंगी हॉली क्रॉस शाळेच्या मुख्याध्यापिका जॅसिंथा सुआरेस, उपमुख्याध्यापिका प्रिसिला लोबो तसेच तसेच भारतीय रोल बॉल संघटनेचे सचिव प्रताप पगार यांची या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती लाभली. या सर्व विद्यार्थ्यांना हॉली क्रॉस शाळेचे क्रीडा शिक्षक रवींद्र देसाई आणि राहुल पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# जीवनदीप महाविद्यालय प्रजासत्ताक दिन संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

स्वतंत्र भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सोमवार दिनांक २६- ०१- २०२६ रोजी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे संस्थापक नारायण बाबा घोडविंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले; याप्रसंगी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य. प्रकाश रोहणे, विधी महाविद्यालय प्राचार्य. जयकुमार रिजवानी, निर्मल इंग्लिश मीडियम स्कूल मुख्याध्यापिका. भावना कुंभार, माजी विद्यार्थी, पालक व मान्यवर उपस्थित होते. ध्वजगीत व राष्ट्रगीत झाल्यानंतर NCC व स्काऊट गाईड च्या विद्यार्थ्यांनी उत्तम रीतीने परेड सादर केली; तसेच निर्मल इंग्लिश मिडीयम स्कूल गोवेली, कनिष्ठ महाविद्यालय गोवेली व परिसरातील शाळांतील विद्यार्थ्यांनी देशभक्ती पर गीतांवर कवायती सादर करत संपूर्ण वातावरण देशभक्तीमय करून टाकले. अध्यक्षांनी सर्वांना उद्बोधन पर मार्गदर्शन केले सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश लकडे यांनी केले. उपस्थित सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी माजी विद्यार्थी यांच्या एकत्रित सहभागाने हा प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# वाढदिवस "गणेश" सरांचा



उत्सवमूर्ती आहेत गणेशसर
कार्याने जॉय लिव्हिंग केले अजरामर
गरीब जनतेची सेवा केली काकणभर
समाजाला वाहून घेतले दिवसभर //1//
वाढदिवस आहे माझ्या गुरूंचा
गुरु आहेत माझ्यापेक्षा वयाने लहान
सामाजिक कार्याने मात्र खुप महान
अनेक पुरस्कारांचे त्यांनी मिळविले मान //2//
या जन्मदिवशी शुभ क्षणी
आपली स्वप्ने साकार व्हावीत
आजचा दिवस आपल्यासाठी
एक अनमोल आठवण ठरावी //3//
आपले आयुष्य सुगंधी फुलासारखे
अधिकाधिक सुंदर व्हावे
आदरणीय "गणेश"हिरवे सरांना
वाढदिवसाच्या खुप खुप
हार्दिक हार्दिक शुभेच्छा

**- लीना बल्लाळ,**
**वृत्तपत्र लेखिका.**
**9920524424**

# भुवन शाळेच्या खेळाडूंवर ग्रामस्थांकडून भेटवस्तूंचा वर्षाव





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : जिल्हा स्तरावर लंगडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्या बद्दल जि. प. भुवन शाळेच्या खेळाडूंचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. आज ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून या सर्व विद्यार्थ्यांवर ग्रामस्थांकडून व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुरबाड कडून विशेष भेटवस्तू,ड्रेस, शैक्षणिक साहित्य, गौरवचिन्ह देऊन विशेष कौतुक करण्यात आले. हा कौतुक सोहळा मुरबाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक दादासो एडके, प्रसिद्ध समाजसेवक व दानशूर व्यक्तिमत्व मेहबूबभाई पैठणकर, गटशिक्षणाधिकारी मधुकर घोरड, रघुनाथ बांगर यांच्या शुभहस्ते पार पडला. प्रथमच जिल्हा परिषद भुवन शाळेच्या खेळाडूंना जिल्हा स्तरावर प्रथम बक्षीस भेटल्यामुळे सर्व ग्रामस्थांना व शिक्षकांना अत्यानंद झाला आहे.विजेत्या संघाचे ढोलताशयाच्या गजरात मिरवणूक काढून ग्रामस्थांनी स्वागतही करण्यात आले. आज प्रजासत्ताक दीनाचे औचित्य साधून सर्व ग्रामस्थांनी या खेळाडूंचे गोड कौतुक करत, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारत शैक्षणिक साहित्याची भेट दिली आहे.तसेच यामध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतिनेही दप्तर, वह्या, ट्रॉफी देऊन या मुलींना प्रोत्साहन देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून पोलीस निरिक्षक दादासो एडके यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, दररोज होणारे अपघात या विषयी मार्गदर्शन करून शाळेचे शिक्षक व खेळाडूंना पुढील भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी पोलीस निरिक्षक दादासाहेब एडके, गटशिक्षणाधिकारी मधुकर घोरड, समाजसेवक मेहबूबभाई पैठणकर, सरपंच भुमिका बांगर,उपसरपंच सुनिल बांगर, माजी सरपंच रघुनाथ बांगर,दर्शना बांगर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप बांगर,ग्रामसेविका सौ. सिंघासने, रिपाईचे दिनेश उघडे, अन्याय अत्याचार निर्मुलन समितीचे अण्णा साळवे, लोकक्रांतीचे नरेश मोरे, रमेश देसले, जितेंद्र पंडित,सुधाकर शेळके, पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर करडे, तालुका अध्यक्ष दिलीप पवार, सचिव संजय बोरगे, संतोष राऊत,मिडियासेलचे चेतन पोतदार, राजिव चंदने,शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डौलाने बहरलेली झाडे पाहून मनाला आनंद होतो

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशिंद** : २५ वर्षा पुर्वी झावलेली झाडे आजही डौलाने उभी आहेत तसेच येणा-या जाणा-यांना सावली देत आहेत हे पाहून मनाला आनंद होत आहे असे प्रतिपादन भिंवडी गटाचे गटसभापती सुभाष खिसमतराव यांनी केले. आज प्रजासत्ताक दिन साजरा करताना आनंद होत आहे तसाच आनंद १९९७ साली न्यू इंगलीश स्कुल चाविंद्रा येथे लावलेली १०० झाडे डौलाने बहरलेली पाहाताना आनंद होत आहे. या शाळेतील शिक्षक व मी स्वता घेतलेली मेहनत मनाला आनंद देऊन जाते. दर दोन वर्षांनी मी स्वताच्या खर्चाने या झाडांची रंग रंगोटी करत असतो. आपण आपल्या समाधानासाठी वृक्ष लागवड केली पाहिजे असाही संदेश खिसमतरावांनी उपस्थितांना दिला.



# संविधान अधिकार देतो तर भाषा आपल्याला ओळख देते

## - दिलीप कोरे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** :स्वतंत्र भारताचा प्रजासत्ताक दिन सार्वभौम, लोकशाही प्रधान आहे. या प्रसंगी आपण आपली भाषा स्वतंत्र ठेवली आहे का? याचा विचार होणे आवश्यक आहे कारण संविधान आपल्याला अधिकार देतो तर भाषा आपल्याला ओळख देते. मराठी भाषा ही इतिहासाची भाषा आहे. अभंग, पोवाडे, लोकगीते, भारुडे यातून मराठी भाषा समृद्ध झाली आहे. परंतु सांस्कृतिक घसरण होऊ नये म्हणून मराठीचे संवर्धन ही काळाची गरज आहे. त्यासाठी भाषेचा सक्रीय वापर, निर्मिती, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अभिजात मराठी हस्तांतरित करा असे मोलाचे मार्गदर्शन प्रमुख पाहुणे म्हणून कोकण ग्रंथालय संघाचे अध्यक्ष दिलीप कोरे यांनी प्रजासत्ताक दिनी सार्वजनिक वाचनालय कल्याण मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण सोहळ्या प्रसंगी केले.




देशाचे सज्ञान, सुजाण, आदर्श नागरिक होण्याकरिता मराठी भाषेशी समरस व्हा, आपली भाषा वापरातून जिवंत ठेवा. असा मोलाचा सल्ला वाचनालयाचे अध्यक्ष श्री. मिलिंद कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या प्रस्ताविकेतून उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (१४ जाने.ते २८ जाने.) वाचनालयाचे सरचिटणीस श्री.भिकू बारस्कर यांच्या संकल्पनेतून महाविद्यालयीन विद्यार्थी चालवितात वाचनालय, पुस्तक रसग्रहण स्पर्धा २०२६, माझे कल्याण शहर – प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२६ अशा विविध स्पर्धातून मराठी भाषेचा पचार व प्रसार व्हावा या उद्देशातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धांमध्ये बिर्ला महाविद्यालय कल्याण, प्रगती महाविद्यालय, डोंबिवली, ॲचिव्हर्स महाविद्यालय,कल्याण, सी.एच.एम. महाविद्यालय, उल्हासनगर अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहात सहभाग नोंदविला होता. विजयी स्पर्धकांना पारितोषिक प्रदान करण्यात आली.

रोटरी क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा श्रीमती रुईता सपकाळ यांनी प्रमुख पाहुण्या म्हणुन वाचनालयाच्या सर्व उपक्रमाला व पुढील वाटचालीला शुभेच्छा देऊन रक्कम २१,०००/- देणगी देणार असल्याचे जाहीर केले प्रसंगी वाचनालयाच्या उपाध्यक्षा श्रीमती आशा जोशी, चिटणीस श्रीमती नीलिमा नरेगलकर, कार्यकारणी सदस्या श्रीमती अमिता कुकडे, कार्यकारीणी सदस्य अरुण देशपांडे, वाचक वर्ग, शिक्षक गण, विद्यार्थी वर्ग व वाचनालयाच्या ग्रंथसेविका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

# घराला गोग्रासवाडीत लागली भीषण आग

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : येथील पूर्वेकडील नामदेव पथावरील लक्ष्मीनारायण बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावर एका घराला लागलेल्या भीषण आगीत घरातील संपूर्ण सामान जळून खाक झाले. आग लागली त्यावेळी घर बंद असल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे.

पहिल्या मजल्यावर शेखर बागायतदार राहतात. रविवारी दुपारी पावणेदोनच्या सुमारास घराला कुलूप लावून ते घराबाहेर निघून गेले. दहा ते पंधरा मिनिटातच घरामध्ये मोठी आग लागली. धुराचे लोट सर्वत्र पसरले. आग लागल्याची माहिती मिळताच इमारत आणि परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. उद्धवसेनेचे जिल्हाप्रमुख तात्या माने आणि भाजपचे नवनिर्वाचित नगरसेवक अभिजित थरवळ हे देखील घटनास्थळी दाखल झाले. तत्काळ डोंबिवली अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. आगीची माहिती मिळताच बागायतदार यांनीही घराकडे धाव घेतली. आगीवर अग्निशमन दलाने नियंत्रण मिळविले. परंतु घराचे मोठे नुकसान झाले आहे.

# जे एम एफ संस्थेत रजत महोत्सव व रेडिओ स्टेशन उद्घाटन उत्साहात




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

जे एम एफ संस्थेत दिनांक १९ ते २४ जानेवारीपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम, प्रेरणोत्सव व वार्षिक स्नेह संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने वर्षभर विविध कार्यक्रम रौप्य महोत्सव म्हणून साजरे केले गेले.

वसंत पंचमीच्या मुहूर्तावर 'जे एम एफ ध्वनी ८८.४' रेडिओ स्टेशनचे उद्घाटन करण्यात आले. हा रेडिओ स्टेशन शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम सतत प्रसारित करेल आणि सर्व नागरिकांना संस्थेशी जोडेल.

दिनांक २३ जानेवारी रोजी 'रौप्यगौरव पुरस्कार' वितरण सोहळा पार पडला. निवडक सदस्यांना त्यांच्या कार्याची दखल म्हणून स्मृतिचिन्ह व पुरस्कार प्रदान करण्यात आले. संस्थेच्या प्रमुखांनी सर्व सदस्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी प्रेरणा दिली. नृत्य, गायन व नाटिका कार्यक्रमांचे सादरीकरण करून, जे एम एफ संस्थेचा रजत महोत्सव मोठ्या धूमधडाक्यात साजरा झाला.

# कांबा ग्रामपंचायत हद्दीत बालक पालक क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कल्याण ग्रामीण जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत कल्याण पंचायत समितीच्या कांबा ग्रामपंचायत हद्दीतील मैदानावर बालक पालक क्रिडा स्पर्धा व विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर ग्रामपंचायत सदस्या आशाताई भोईर या अध्यक्षा तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाचे सदस्य तथा पत्रकार संजय कांबळे हे उपस्थित होते तर विशेष उपस्थिती कांबा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच संदिप पावशे ग्रामपंचायत अधिकारी सुनंदा पाटील या उपस्थित होत्या. प्रथम पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वल राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. जांभूळ बिट अंतर्गत कांबा येथे वाघेरापाडा,नानेपाडा,पठार पाडा,पाचवा मैल,पावशेपाडा ,या परिसरातील अंगणवाड्या तील मुले यामध्ये सहभागी झाले होते,चिमुकले अंत्यंत उत्साहाने यात सहभागी झाले होते. यातील स्पर्धेतील विजेत्या मुलांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला यावेळी मुख्य सेविका प्रज्ञा निपूर्ते,शुभांगी बनसोडे,भारती सुरोशे,सुजाता गायकर आदी मान्यवर उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी या बिटातील सेविका मदतनीस यांनी परिश्रम घेतले.

# अंबरनाथमध्ये घरपट्टी थकबाकीदारांसाठी 'अभय योजना' लागू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ** : अंबरनाथ शहरातील मालमत्ता कर थकबाकी असलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी अंबरनाथ नगरपरिषद प्रशासनाने "अभय योजना" राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत थकबाकीदार नागरिकांना मूळ एक रकमी कर रक्कम भरण्यावर शास्तीमध्ये ५०% सवलत देण्यात येणार असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्ष, सौ. तेजश्री करंजुले-पाटील यांचे कडून करण्यात येत आहे. ही योजना दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंत लागू असणार आहे.

अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित करदारांनी नगरपरिषदेच्या मालमत्ता कर विभागाशी संपर्क साधावा. अथवा नगरपरिषदेच्या https://mahaulb.in/PortalSite/#/app/home या अधिकृत संकेत स्थळावर जावून आपली थकबाकी रक्कम जमा करावी. या अभय योजनेमुळे नागरिकांवरील आर्थिक भार कमी होऊन, कर वसुलीला प्रोत्साहन मिळून नगरपरिषदेच्या महसुलात वाढ होण्यास मदत होणार आहे.

तरी अंबरनाथ शहरातील सर्व थकबाकीदार नागरिकांनी या अभय योजनेचा लाभ घ्यावा व आपली थकबाकी दिनांक : ३१ मार्च, २०२६ पर्यंत भरून सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष, सौ. तेजश्री करंजुले-पाटील यांनी केले आहे.

# सौ. कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालयात ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

प्रजासत्ताक दिन हा भारताच्या राष्ट्रीय प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारताचे संविधान अंमलात येऊन 'सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक' म्हणून देशाने औपचारिकपणे आपली ओळख स्थापित केली. सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान आणि विधी महाविद्यालय म्हसा यांच्या संयुक्त विद्यमाने आज महाविद्यालयात दि. २६ जानेवारी, २०२६ रोजी ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर तसेच विधी महाविद्यालयातील प्राध्यापक गणेश चहाड सर तसेच सर्व प्राध्यापक









शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषण, देशभक्तीपर गीते सादर केली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे ११ वी च्या विद्यार्थिनींनी लेझीम प्रकार सादर केले. क्रीडा प्रशिक्षक प्रा. दिनेश शेळके सर व प्रा. संदिप भावार्थे सर यांनी विद्यार्थ्यांकडून लेझीम ची तयारी करून घेऊन आणि सगळयांच्या एकत्रित मेहनतीने संपूर्ण कर्यक्रमाचे उत्कृष्ट असे नियोजन केले गेले. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. विजय सोनार सर यांनी केलं. अशा रीतीने उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

# भविष्यवेध



**बुधवार**
**२८ जानेवारी २०२६**

**मेष**
तुमच्या पालकांसोबतचे संबंध सौहार्दपूर्ण राहतील. कौटुंबिक संबंधही सुसंवादी राहतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला पूर्ण सहकार्य मिळेल. पर्यटनाशी संबंधित लोकांना आर्थिक फायदा होईल.

**वृषभ**
तुम्हाला उत्साही वाटेल. कुटुंबातील सदस्यांशी संबंध सुधारतील. स्वतःला काही सर्जनशील कामात गुंतवून घ्याल. संयमी निर्णय यशाचे नवीन मार्ग उघडू शकतात. जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष टाळावं.

**मिथुन**
पैशाच्या बाबतीत तुम्ही लोकांवर जास्त विश्वास ठेवणे टाळावे. तुमचे खर्च वाढू शकतात. कोणालाही पैसे उधार देण्यापूर्वी काळजी घेणे चांगले राहील. जवळची व्यक्ती दगा करू शकते.

**कर्क**
तुमच्या जोडीदारासोबत बाहेर जेवायला जाऊ शकता. तुमच्या नात्यात सकारात्मक भावना निर्माण होतील. कामात यश मिळण्याची शक्यता आहे. मित्रांकडून तुम्हाला फायदा होऊ शकतो.

**सिंह**
काम नीट पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित कराल. तुम्हाला ऑफिसमध्ये काही बाबींवर चर्चा करावी लागू शकते. या राशीखाली जन्मलेल्या विद्यार्थ्यांचे मित्रांसोबतचे संवाद वाढू शकतात.

**कन्या**
व्यवहारांसाठी आजचा दिवस चांगला आहे. तुमच्या जोडीदाराच्या कामगिरीची प्रशंसा केल्याने तुमच्या वैवाहिक जीवनात गोडवा येईल. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात यश मिळू शकेल.

**तुळ**
व्यवसाय वाढवण्यासाठी दुसऱ्याकडून चांगली सूचना मिळेल. त्यांना आर्थिक आणि कामाच्या बाबतीतही चांगली बातमी मिळू शकते. योजना आखल्या असतील ती सगळी कामं पूर्ण होतील.

**वृश्चिक**
सहलीची योजना आखू शकता. आज तुमच्या जोडीदारासोबत वेळ घालवल्याने तुमचे नाते अधिक दृढ होईल. आज तुम्ही मित्रांसोबत चित्रपट पाहण्याचा प्लान बनवू शकता.

**धनु**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्हाला तुमच्या कारकिर्दीत लक्षणीय यश मिळेल. जर तुम्ही एखादे महत्त्वाचे काम पूर्ण करण्याची योजना आखत असाल तर ते आज पूर्ण होईल.

**मकर**
तुमची कामे पूर्ण करण्यासाठी तुमच्याकडे पुरेसा वेळ नसेल. अस्वस्थ होण्याऐवजी धीर धरा आणि योग्य युक्ति शोधून काम पूर्ण करा. अचानक कामाचा ताण वाढू शकतो.

**कुंभ**
तुमच्या कामात मित्राची मदत घेऊ शकता. व्यवसायात भागीदारी फायदेशीर ठरू शकते. मुलांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळू शकते. स्वतःला काही सर्जनशील कामात गुंतवून घ्याल.

**मीन**
आर्थिक पातळीवर खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. वैवाहिक जीवनातही मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. कोणत्याही भांडणापासून दूर राहा. जास्त ताण-तणाव येऊ शकतो.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| Facebook | https://www.facebook.com/jeevandeepnews/ |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep/ |
| X | https://x.com/Jeevandeepvarta |
| www | https://jeevandeepvarta.com/ |

# भिवंडी मनपाच्या भाजप गटनेतेपदी संतोष शेट्टी यांची नियुक्ती

**भिवंडी शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला २२ जागा मिळाल्या असून महापौरपद आणि सत्ता स्थापनेसाठी पक्षाच्या हालचालींना वेग आला. या पार्श्वभूमीवर नगरसेवक संतोष शेट्टी यांची भाजपच्या गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे.**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २७**

**भिवंडी :** भिवंडी शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला २२ जागा मिळाल्या असून महापौरपद व सत्ता स्थापन करण्याच्या पार्श्वभूमीवर हालचालींना वेग आला आहे. अशा परिस्थितीत भाजपच्या गटनेतेपदी नगरसेवक संतोष शेट्टी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भातील निर्देश देणारे पत्र भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी जाहीर केले आहे.

भिवंडी महापालिका निवडणुकीत भाजपच्या तिकिटावर निवडून आलेले नगरसेवक संतोष शेट्टी, प्रकाश टावरे, निलेश चौधरी, नारायण चौधरी, यशवंत टावरे, सुमित पाटील तसेच वैभव भोईर यांनी गटनेतेपदासाठी पक्ष कार्यालयात झालेल्या बैठकीत आपली दावेदारी मांडली होती. त्यामुळे स्थानिक पक्ष संघटनेच्या वतीने प्रभारी आमदार महेश चौघुले आणि शहराध्यक्ष रवी सावंत यांनी गटनेतेपदाचा निर्णय प्रदेश नेतृत्वावर सोपवला होता.

यानंतर प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून संतोष शेट्टी यांच्या नावाला पसंती दिली. शहराध्यक्ष रवी सावंत यांना पाठवलेल्या पत्राद्वारे गटनेतेपदी संतोष शेट्टी यांची नियुक्ती निश्चित करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. या निर्णयानंतर भाजपच्या नगरसेवकांनी शेट्टी यांचे अभिनंदन केले.

दरम्यान, शासन आणि महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून भिवंडी शहराच्या विकासाला प्राधान्य देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया नवनियुक्त गटनेते संतोष शेट्टी यांनी दिली आहे.

# 'पनवेलच्या चाव्या कोणाच्या हातात?'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २७**

पनवेल - पनवेल महानगरपालिकेतील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवून सत्ता कायम राखली असली, तरी आता पनवेलच्या राजकारणाचे लक्ष महापौर पदाकडे केंद्रित झाले आहे. नुकत्याच रविवारी महायुतीच्या गटनेतेपदी नितीन पाटील यांची सर्वानुमते निवड झाल्यानंतर, महापौरपद त्यांच्याच गळयात पडणार का, की पक्षातील राजकीय गणितांमुळे वेगळाच चेहरा पुढे येणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. जिल्हा परिषद निवडणुकांचा प्रचार सुरू असल्याने भाजपने महापौरपदाची घोषणा जाणीवपूर्वक लांबवली असून, निकालानंतरच अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून सांगितले जात आहे.

२०१७ च्या महापालिका निवडणुकीनंतर भाजपने डॉ. कविता चौतमोल यांना महापौरपदाची संधी देत 'मलाच संधी' या अपेक्षांना धक्का दिला होता. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची भूमिका निर्णायक ठरली होती. यावेळीही महापौर निवडीची सूत्रे आमदार ठाकूर यांच्या हाती असली, तरी या प्रक्रियेच्या पडद्यामागून अनेक राजकीय डावपेच सुरू असल्याची चर्चा आहे.

रविवारी गटनेतेपदी निवड झालेल्या नितीन पाटील यांचे नाव महापौरपदासाठी चर्चेत असले, तरी त्यांनाच संधी मिळेल, असे सध्या तरी पडद्यासमोर दिसत असले तरी भाजपने अधिकृत घोषणा न केल्याने महापौरांच्या नावामागील उत्सुकता कायम आहे. शेकापमधून भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर नितीन पाटील यांचा फेब्रुवारी २०१७ मध्ये शेकापचे प्रितम म्हात्रे यांच्यासोबत वाद झाला होता. हे प्रकरण पोलीस ठाण्याच्या दारापर्यंत गेले. गुन्हे दाखल झाले. त्यानंतर झालेल्या महापालिका निवडणुकीत शेकापच्या कपबशी चिन्हावर निवडणूक लढविलेल्या प्रितम म्हात्रे यांनी नितीन पाटील यांच्या कमळाचा पराभव केला होता. मात्र आमदार ठाकूर यांच्या जवळचे मानले जाणारे नितीन पाटील यांना नंतर स्वीकृत नगरसेवक म्हणून सभागृहात स्थान देण्यात आले. नितिन पाटील यांनी वेळोवेळी भाजपची बाजू सभागृहात लावून धरली. त्यामुळे नितीन पाटील यांच्यावर जिल्हा सरचिटणीस ही जबाबदारी सोपविण्यात आली.

# 'भवन नाही, संदेश आहे' ! | 'बिहार भवन'वर मनसेचा व्यंगचित्रातून हल्लाबोल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २७**

**ठाणे :** मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित 'बिहार भवन'प्रकल्पावरून ठाणे-मुंबई परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने व्यंगचित्राच्या माध्यमातून या निर्णयाला तीव्र विरोध केला आहे. ठाणे शहरात मनसेच्या जनहित व विधी विभागाचे ठाणे शहराध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी 'भवन नाही, संदेश आहे' या नावाने व्यंगचित्रातून सरकारच्या धोरणांवर




थेट निशाणा साधण्यात आला आहे. ठाण्यातील नितीन जंक्शन परिसरात या व्यंगचित्राचे बॅनर झळकले असून महाराष्ट्र सैनिकांनी सकाळी बिहार भवन विरोधात घोषणाबाजी केली होती. दरम्यान मनसेचे ठाणे शहराध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी माध्यमांशी बोलताना या संबंधित माहिती दिली आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टच्या याच जागेत सुमारे अडीच हजार गोदी कामगार गेली बारा वर्षे हक्काच्या घरासाठी संघर्ष करत आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असताना प्रशासनाने त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले आहे. मात्र, तीच जमीन बिहार सरकारला बाजारभावापेक्षा कमी दरात देण्यात आल्याचा आरोप महिंद्रकर यांनी केला आहे. यामुळे स्थानिक मराठी माणसांमध्ये असंतोष वाढत असल्याचे चित्र आहे. मुंबई, ठाणे आणि जवळच्या भागात वाढती लोकसंख्या, अपुऱ्या आरोग्य सुविधा आणि घरांची टंचाई या समस्या गंभीर होत चालल्या असताना सरकारने स्थानिकांच्या गरजांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी महिंद्रकर आणि किशोर भिलारे यांनी केली आहे. या निर्णयांमुळे सामाजिक व राजकीय तणाव वाढण्याची शक्यता असल्याचा इशाराही देखील महाराष्ट्र सैनिकांनी दिला आहे.

# महासभा अभावी मुख्याध्यापकांच्याच हस्तेच ध्वजारोहण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २७**

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक पार पडली असली तरी पहिली महासभा अद्याप झालेली नसल्यामुळे प्रशासनासमोर काही प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर २६ जानेवारी रोजी साजरा झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमाबाबत महापालिका प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला. यंदा नगरसेवकांना ध्वजारोहणासाठी आमंत्रित केले गेले नाही, तर ध्वजारोहण महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये मुख्याध्यापकांच्या हस्तेच पार पडले.

नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांनी २४ जानेवारी रोजी यासंदर्भातील सुधारित सूचना प्रसिद्ध केल्या होत्या. या सूचनेनुसार, ध्वजारोहणाचा अंतिम निर्णय महासभा स्तरावर होणार असल्यामुळे सध्याच्या परिस्थितीत नगरसेवकांना आमंत्रित न करण्याचा निर्णय घेतला गेला. याआधी शाळांना पाठविण्यात आलेले सर्व संदेश आणि सूचना दुर्लक्षित करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले.

दरम्यान, काही शाळांकडून यापूर्वीच नगरसेवकांना आमंत्रण पत्रिका दिल्या गेल्या होत्या, तर संबंधित मुख्याध्यापकांनी त्यांना महापालिकेच्या सुधारित निर्णयाची माहिती दिली आणि यंदा ध्वजारोहण मुख्याध्यापकांच्या हस्तेच पार पडल्याची विनंती केली होती.

# महापालिकेनंतर आता जिल्हा परिषदांवर भाजपची नजर!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २७**

राज्यातील महानगर पालिकांच्या निवडणुकांचा धुरळा शांत होत नाही तोच आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी राजकीय वातावरण तापले आहे. सर्वच पक्षांनी आपली कंबर कसली असून, भारतीय जनता पक्षाने या ग्रामीण भागातील सत्ता काबीज करण्यासाठी मोठी रणनीती आखली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः या निवडणुकीच्या प्रचारासाठी मैदानात उतरणार आहेत.

**■ ७ दिवसांत २२ सभांचा झंझावात**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १२ जिल्हा परिषदांच्या प्रचारासाठी राज्याचा दौरा करणार आहेत. २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी या कालावधीत ते प्रत्येक जिल्ह्यात सभा घेणार आहेत. २८ जानेवारी रोजी रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या कोकण पट्ट्यातील जिल्ह्यांपासून प्रचाराचा शुभारंभ होईल. सात दिवसांच्या या दौऱ्यात मुख्यमंत्री एकूण २२ मोठ्या जाहीर सभांना संबोधित करतील. महानगरपालिकांनंतर ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर भाजपचे वर्चस्व निर्माण करणे, हा या दौऱ्यामागचा मुख्य हेतू आहे.

**■ निवडणुकीचे महत्त्वाचे टप्पे**

सर्वोच्च न्यायालयाच्या आरक्षण मर्यादेच्या निर्णयानंतर सध्या केवळ १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ही निवडणूक होत आहे. उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सध्या स्थगित आहेत.

**■ प्रशासकीय तयारी पूर्ण**

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांचा कार्यकाळ संपल्याने सध्या तेथे प्रशासक राजवट आहे. मात्र, सध्या होत असलेल्या १२ जिल्ह्यांतील निवडणुकांसाठी १३ जानेवारीपासूनच आचारसंहिता लागू झाली आहे. महानगरपालिका निवडणुकांपेक्षा ग्रामीण भागात स्थानिक राजकारण अधिक तीव्र असल्याने या निवडणुकांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या झंझावाती दौऱ्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये मोठे चैतन्य निर्माण होण्याची शक्यता आहे.

# वसई-विरार महापालिकेत महापौर आरक्षणावरून वादंग

## काँग्रेस प्रदेश सरचिटणीस डॉ. दिनेश कांबळे यांनी शासनाकडे तक्रार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २७**

**वसई : वसई-विरार महापालिकेतील महापौरपदाचे आरक्षण संविधान, प्रचलित कायदे आणि राज्य सरकारच्या नियमांनुसार एससी आणि एसटी प्रवर्गासाठी असणे आवश्यक होते, असे सांगितले जात असताना, हे पद यावेळी खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहे. यावर काँग्रेस प्रदेश सरचिटणीस डॉ. दिनेश कांबळे यांनी आक्षेप घेतला असून त्यांनी संबंधित तक्रार राज्य शासनाचे मुख्य सचिवांकडे सादर केली आहे.**

वसई-विरार महापालिकेत २०१५ मध्ये महापौर पद खुल्या प्रवर्गासाठी वापरले गेले होते. त्यानंतर २०१९ मध्ये हे पद सोडत काढले गेले आणि ते एसटी प्रवर्गासाठी राखीव झाले होते. मात्र २०२० मध्ये होणाऱ्या निवडणुका कोरोना आणि अन्य कारणांमुळे उशीर झाल्याने, या निवडणुकांचा अंमलबजावणी प्रक्रियेत हे आरक्षण प्रत्यक्षात वापरले गेले नाही. परिणामी, महापौर पद उपलब्ध झाले असून यावेळी खुल्या प्रवर्गासाठी आरक्षण दिले गेले आहे.

डॉ. दिनेश कांबळे यांच्या मते, महापौरपद पुन्हा खुल्या




प्रवर्गासाठी वापरणे कायद्याच्या दृष्टीने प्रश्नचिन्ह निर्माण करते. वसई-विरार महापालिकेत एससी आणि एसटी प्रवर्गासाठी स्वतंत्रपणे ५-५ जागा आरक्षित आहेत. संविधान, कायदे आणि शासन निर्णयानुसार या महापौर पदाचे आरक्षण एससी किंवा एसटी प्रवर्गासाठी असणे आवश्यक होते, असे कांबळे यांनी ठळक केले. काँग्रेस नेते म्हणाले की, "महापालिकेसाठी महापौर पदाची सोडत काढण्यात आली, त्यावेळी कोणत्या शासन निर्णयानुसार हे पद खुल्या प्रवर्गासाठी दिले गेले, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. नियम व कागदपत्रे स्पष्ट सांगतात की, हे पद एससी किंवा एसटी प्रवर्गासाठीच राखीव असावे." या तक्रारीने महापालिकेत आणि राजकीय वर्तुळात नव्याने चर्चा सुरु केली आहे. स्थानिक पक्षांनी आणि समाजातील अनुसूचित जाती-जनजातीच्या प्रतिनिधींनी देखील या मुद्यावर लक्ष केंद्रित केले असून, महापौरपदावर कोणाला निवडले जाईल आणि आरक्षणाचे नियोजन कसे होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वसई-विरार महापालिकेतील या महत्त्वाच्या पदावर आरक्षण नियमांचे पालन होईल की नाही, हे पुढील काळात राज्य शासनाचे निर्णय स्पष्ट करतील. या वादामुळे नगरपालिकेतील प्रशासन आणि निवडणूक प्रक्रियेवर देखील परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**महापौरपदाचे आरक्षण वादग्रस्त – वसई-विरार महापालिकेत महापौरपदाचे आरक्षण एससी/एसटीसाठी असणे आवश्यक होते, परंतु यावेळी ते खुल्या प्रवर्गासाठी राखीव करण्यात आले.**

*******

**काँग्रेसने तक्रार केली – प्रदेश सरचिटणीस डॉ. दिनेश कांबळे यांनी हा मुद्दा उभा करून राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे तक्रार सादर केली.**

******

**इतिहासाची पार्श्वभूमी – २०१५ मध्ये हे पद खुल्या प्रवर्गासाठी वापरले गेले; २०१९ मध्ये एसटीसाठी राखीव झाले; २०२० निवडणुका कोविडमुळे झाल्या नाहीत, त्यामुळे आरक्षण प्रत्यक्षात लागू झाले नाही.**

# मनसेचे राजू पाटील रिअल धुरंधर ?

## कल्याण डोंबिवलीत झळकले पोस्टर्स !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २७**

**कल्याण -** कल्याण डोंबिवली पालिकेच्या सत्ता स्थापनेत जुने सर्व रागरुसवे विसरून मनसेचे - नेते राजू पाटील यांनी कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या बरोबर जुळवून घेतले. पालिकेतील सत्तेत मनसेचे नऊ नगरसेवक घेऊन बिनाशर्त सहभागी झाले. या राजकीय चकव्याने भाजपची पालिकेतील सद्दी कमी करण्यात शिवसेना शिंदे गटाला यश आले.

या खेळीने युतीत सहभागी असुनही भाजप वेशीवर राहिला आणि वेशीवरचे राजू पाटील घरातील पाहुणे करण्यात शिवसेना शिंदे गटाची कल्याण डोंबिवलीतील खेळी यशस्वी झाली. त्यामुळे मनसेच्या कल्याणमधील पदाधिकाऱ्यांनी राजू पाटील यांना रिअल धुरंधर अशी पदवी देऊन त्याचे फलक कल्याण शहरात लावले आहेत.




# शेतकऱ्यांच्या हितासाठीच कृषी उत्पन्न बाजार समितीची नवीन आधुनिक इमारत – पालकमंत्री गणेश नाईक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २७**

**पालघर:** शेतकरी, व्यापारी आणि बाजार समितीच्या सर्व घटकांना न्याय देणारी, आधुनिक कृषी उत्पन्न बाजार समितीची नवीन इमारत शेतकरी हितासाठी नियोजनबद्ध विकास साधणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले.

वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नव्या कार्यालय इमारतीचे भूमिपूजन नंडोरे नाका येथे उत्साहात पार




पडले. यावेळी खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित, आमदार स्नेहा दुबे-पंडीत, नगराध्यक्ष उत्तम घरत, पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पुरुषोत्तम पाटील, उपनगराध्यक्ष राजेंद्र आत्माराम पाटील, उपसभापती उत्तम मधुकर पाटील, जिल्हा उपनिबंधक शिरीष कुलकर्णी व शेतकरी-व्यापारी उपस्थित होते.

"कृषी उत्पन्न बाजार समितीची जागा न्यायालयीन प्रक्रियेतून कायदेशीररीत्या समितीच्या ताब्यात आली आहे. आता त्या जागेवर शेतकरी व व्यापाऱ्यांच्या हिताची, पारदर्शक आणि कार्यक्षम बाजार व्यवस्था उभी करणे ही आपली जबाबदारी आहे." असे सांगत गणेश नाईक यांनी गाळे, दुकाने, शेतकऱ्यांसाठी व व्यापाऱ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा असलेली इमारत उभारण्याचे निर्देश त्यांनी जिल्हा उपनिबंधकांना दिले. आपण जाती, भाषा, यापलीकडे जाऊन काम पाहतो. चेहरा नव्हे तर काम महत्त्वाचे आहे असे स्पष्ट करत पालकमंत्री गणेश नाईक यांनी जनता दरबाराच्या माध्यमातून कोणताही प्रश्न प्रलंबित राहणार नाही, असे सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक समाजाचा विकास हक्काने, आत्मविश्वासाने व्हावा, हीच शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळावा, हा एपीएमसीचा मूळ उद्देश असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.






# फ्लॅट देण्याचे खोटे आश्वासन ■ 65 लाख रुपयांची फसवणूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी ) :** भिवंडीमध्ये घर खरेदी करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या एका व्यक्तीची सुमारे ६५ लाख रुपयांची मोठी फसवणूक झाल्याचा एक खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे.दोन जणांनी फ्लॅट देण्याचे आश्वासन देऊन त्याला ऑनलाइन आणि रोख स्वरूपात मोठी रक्कम घेऊन त्यांनी फ्लॅट दिला नाही अथवा पैसे परत केले नाहीत. या प्रकरणी निजामपुरा पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात रिअल इस्टेट फसवणूक होत असलेला प्रकार उघडकीस आला आहे.याबाबत आता गुन्हे शाखेचे पोलीस तपास करीत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडी शहरातील गोकुळनगर मधील पारिजात बिल्डिंगमध्ये राहणारे कापड व्यवसायिक सुमित विलास वडके (३९) यांना सिद्धार्थ बिहानी (४१) आणि प्रकाश बिहानी (७५) याने स्वतःला रिअल इस्टेट तज्ञ असल्याचे सांगून आकर्षक डील करण्याचे आश्वासन देऊन मुंबईच्या विलेपार्ले परिसरातील फ्लॅटचे आमिष दाखवले. १ मे २०१८ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास, आरोपी हे भिवंडी येथील सुमितच्या घरी पोहोचले आणि फ्लॅट डील पूर्ण करण्याचे नाटक केले. या दरम्यान,त्यांनी तक्रारदाराकडून ऑनलाइन ट्रान्सफर आणि रोख रकमेच्या स्वरूपात ६५ लाख घेतले. कागदपत्रे आणि बुकिंग असल्याचे भासवले. नंतर, सुमितने फ्लॅटच्या कागदपत्रे आणि ताबा बद्दल विचारपूस केली तेव्हा आरोपी टाळाटाळ करू लागले. काही दिवसानंतर कोणताही फ्लॅट बुक केलेला नाही,हे स्पष्ट झाले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, सुमित वडके यांनी २१ जानेवारी २०२६ रोजी निजामपुरा पोलिस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. या घटनेमुळे भिवंडीत रिअल इस्टेट प्रकरणी फसवणुकीचे प्रकार होत असल्याचे उघड झाले आहे.सदर गुन्ह्याचा तपास भिवंडी गुन्हे शाखा युनिट-२ चे पोलीस करीत आहेत.

# सरपंच आदर्श शाळा व सरपंच आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा :** ग्रामपंचायत अबिटघरच्या सरपंच साक्षी साठे यांच्या संकल्पनेतून "सरपंच आदर्श शाळा आणि सरपंच आदर्श शिक्षक पुरस्काराचे" आज 26 जानेवारी 2026 भारताच्या 77 व्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभदिनी वाडा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.वैभव शिंदे व वाडा पंचायतीचे गटशिक्षणाधिकारी उमेश सातपुते यांच्या शुभहस्ते वितरण करण्यात आले. त्याच बरोबर आबिटघर ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचे ध्वजवंदन ज्येष्ठ कर्मचारी जनार्दन पाटील यांच्या हस्ते करवून सरपंच महोदयांनी एक आदर्श वास्तूपाठ घालून दिला. याच औचित्यावर ग्रामपंचायत हद्दीतील 6 शाळांचे एकत्रित स्नेहसंमेलन जि. प. शाळा आबिटघरच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडले. समाजाला अशा दिशादर्शक कार्यक्रमांची



नितांत गरज आहे अशा शब्दात गटविकास अधिकारी यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले. ह्यावेळी उपसरपंच धनश्री पाटील, सदस्य भरत जाधव, सुप्रिया पाटील, स्मिता चिमडा, मनिषा मुकणे, कुलदीप पाटील, कल्याणी साठे, केंद्र प्रमुख घनश्याम कांबळे, विस्तार अधिकारी अरुण पन्हाळे, मुख्याध्यापिका सुरेखा काळे, तसेच सर्व सहकारी शाळांचे मुख्याध्यापक व सहकारी शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सचिव यांच्या समवेत मोठ्या संख्येने ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

## आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते

# डोंबिवलीत सुविधा केंद्राचा शुभारंभ



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने गेल्या अनेक वर्षापासून महापालिका क्षेत्रातील नागरिकांना विविध सेवा पुरविणे करता संगणकीय प्रणाली वर आधारित कार्यप्रणाली सुरू केली होती. परंतु महापालिका जुन्या डोंबिवली विभागीय कार्यालयात असलेले नागरिक सुविधा केंद्र असलेली इमारत धोकादायक झाल्यामुळे सदर नागरिक सुविधा केंद्र इतरत्र स्थलांतरित करण्यात आले होते . तथापि नागरिकांच्या सोयीसाठी डोंबिवली विभागात मध्यवर्ती ठिकाणी नागरिक सुविधा केंद्र उभारण्यासाठी मानपाडा रोडलगतच्या जगन्नाथ कॉमर्स प्लाझा या इमारतीत पहिल्या मजल्यावर असलेल्या महापालिकेच्या सुमारे १२०० चौ. फूट. कार्यालयाचे रूपांतर नागरिक सुविधा केंद्रात करण्याचे निश्चित करण्यात आले आणि आज प्रजासत्ताक दिनी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे हस्ते या नागरिक सुविधा केंद्राचा शुभारंभ करण्यात आला.

या ठिकाणी महापालिकेतर्फे आठ काउंटर असलेले अद्ययावत नागरी सुविधा केंद्र उभारण्यात आले आहे . यात दोन हेल्प डेस्क,कॅशियर रूम,स्टोअर रूम, सर्व्हर रूम, टॉयलेटस इत्यादी सुविधा आहे. या नागरिक सुविधा केंद्रामध्ये नागरिकांना महापालिकेच्या सेवा सुविधा संगणकीय प्रणाली द्वारे उपलब्ध होणार आहेत.

या नागरिक सुविधा केंद्रात मालमत्ता कर तसेच पाणीपुरवठा बिलाची देय रक्कम आणि सुविधांचे अर्ज स्विकारणे इ. कामे केली जातील. मात्र जन्म मृत्यू विभाग आणि जन्म मृत्यू विभागाशी संबंधित सर्व कामकाज हे विराट मॅन्शन, गोपाळ नगर रस्ता क्रमांक 1, डोंबिवली पूर्व येथून केले जाईल अशी माहिती माहिती व तंत्रज्ञान विभागाचे उपायुक्त समीर भूमकर यांनी दिली आहे.

या शुभारंभ समयी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी ,अतिरिक्त शहर अभियंता( यांत्रिकी) प्रशांत भागवत, महापालिका सचिव किशोर शेळके, उपायुक्त समीर भूमकर, रामदास कोकरे, बाळासाहेब चव्हाण, कार्यकारी अभियंता मनोज सांगळे, शैलेश कुलकर्णी, सहा. आयुक्त सुषमा मांडगे, भारत पवार, प्रसाद ठाकूर तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.


**नियमित वाचा**
**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**


# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयात सकाळी ७.३० वाजता आयुक्त अभिनव गोयल यांनी राष्ट्रध्वज फडकावून ध्वजवंदन केले. यावेळी शहर अभियंता अनिता परदेशी, महापालिका उपायुक्त, सचिव, इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. यासमयी अग्निशमन दल, सुरक्षा दल, स्थानिक पोलीस दल व एमएसएफचे जवान यांनी संचलन करून राष्ट्रध्वजाला सलामी दिली. यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या १२ गुणवंत सफाई कर्मचा-यांचा महापालिका आयुक्त व उपस्थित अधिकारी यांच्याहस्ते प्रशस्तीपत्र आणि भेट वस्तु प्रदान करून सत्कार करण्यात आला.

प्रजासत्ताक दिनानिमित्त महापालिकेच्या जुन्या डोंबिवली (पूर्व) विभागीय कार्यालयात अतिरीक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी ध्वजवंदन केले. याप्रसंगी पालिका सदस्य



मंदार हळबे, महापालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तद्नंतर आयुक्त अभिनव गोयल यांनी कॅप्टन विनयकुमार सचान यांच्या स्मारकास पुष्पचक्र वाहून अभिवादन केले. यावेळी कॅप्टन विनयकुमार सचान यांचे बंधू, पालिका सदस्य आसावरी नवरे, खुशबू चौधरी, महापालिका अधिकारी कर्मचारी वर्ग आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी आयुक्त अभिनव गोयल यांनी डोंबिवलीतील प्रेरणा वॉर मेमोरियल येथेही पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

तदनंतर महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी डोंबिवली पूर्वेतील दत्तनगर चौक येथील दीडशे फुटी उंच ध्वज फडकावून ध्वजवंदन केले. भारतीय संविधानाच्या तत्त्वांचा अंगीकार आपल्या दैनंदिन जीवनात करावा आणि सुजाण नागरिक म्हणून आपण समाजासाठी कसे योगदान देऊ शकतो याचा विचार करावा असे आवाहन करीत त्यांनी उपस्थित अधिकारी कर्मचारी वर्ग आणि नागरिक यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आमदार राजेश मोरे यांनीही यावेळी उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आमदार राजेश मोरे, पालिका सदस्य, महापालिका अधिकारी,वरिष्ठ पोलीस अधिकारी ,नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# भाजप ठाणे कार्यालयात राष्ट्रध्वज वंदन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** भाजप ठाणे मध्यवर्ती कार्यालय, वर्तक नगर येथे भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रध्वज वंदन करण्यात आले. यावेळी ठाणे शहर आमदार श्री. संजय केळकर, कोकण पदवीधर आमदार ॲड. निरंजन डावखरे, ठाणे शहर जिल्हाध्यक्ष श्री. संदीप लेले, ठाणे शहर भाजप सरचिटणीस डॉ. समीरा भारती, डॉ. राजेश



मढवी, श्री. विक्रम भोईर, यांच्यासह भाजपचे नगरसेवक, मंडल अध्यक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तीपर गीतांच्या गजरात स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानास अभिवादन करण्यात आले. कार्यकर्ते, स्थानिक नागरिक व युवा वर्गाच्या उत्स्फूर्त सहभागातून संविधाननिष्ठा व राष्ट्रप्रेमाचा संदेश देण्यात आला.

# खर्डी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे ७७ वा प्रजासत्ताक दिन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**खर्डी :** दिनांक. २६ जानेवारी २०२६ रोजी कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी,येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ठीक.८.०० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कळकटे सर यांच्या हस्ते भारतीय ध्वज फडकवण्यात आला. त्या नंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे परेड संचलन झाले. सदर परेड संचलन ही कु. हार्दिक पाटील याने केले. त्यानंतर प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या सभागृहात



पार पडला. या कार्यक्रमात आकांक्षा तिटकारे (११ वी वाणिज्य शाखा),गौरी घरत (११ वी विज्ञान शाखा),तनाज शेख (११ वी विज्ञान शाखा),योगेंद्र जाधव (प्रथम वर्ष कला) आणि सिमरन शेलार(द्वितीय वर्ष विज्ञान) या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत भाषणातून सांगितले. त्यानंतर प्रा. दीपक विशे सर यांनी देशाप्रती आपले कर्तव्य कसे असावे यावर मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कळकटे सर यांनी तरुणाचे समाज आणि देश यांच्या प्रति आपली कर्तव्य काय आहेत यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. रेश्मा घोडविंदे यांनी केले.

तसेच महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळातर्फे प्रजासत्ताक दिनाचे सृजन भित्तीपत्रकाचे अनावरण प्राचार्यांच्या हसते करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशसेवेचे संस्कार रुजावे आणि साहित्यात गोडी निर्माण व्हावी हा यामागील उद्देश.

सदर कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल सोनावणे आणि प्रा. रसिका सकपाळ उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष मा.रविंद्र घोडविंदे सर यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कैलास कळकटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

# जीवनदीप महाविद्यालयात स्पंदन २०२६ महोत्सव संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

विद्यार्थ्यांच्या कला कौशल्यांना तसेच त्यांच्यातील व्यवस्थापन कौशल्याला चालना देण्यासाठी जीवनदीप महाविद्यालयाच्या व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांनी भारतीय परंपरा जपण्याच्या हेतूने स्पंदन महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवाचे पूर्णपणे नियोजन व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांनीच केले होते. शनिवार दिनांक २४- ०१- २०२६ रोजी महाविद्यालयात नृत्य, गायन, मेहंदी, एकपात्री, रांगोळी, फॅशन शो, फोटोग्राफी इत्यादी स्पर्धांचे आयोजन केले होते. या महोत्सवाची सुरुवात ही गणरायाच्या चरणी दीपप्रज्वलन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सर्व स्पर्धांमध्ये आवडीने सहभाग घेतला. जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे यांनी विद्यार्थ्यांना उत्तम रीतीने




मार्गदर्शन केले व या कार्यक्रमाकरिता विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रम प्रसंगी डॉ. प्रा. शिवाजी वाघमारे मुंबई विद्यापीठ लोककला अकादमी यांनी लोककलेचा नजराणा सर्वांसमोर सादर केला. यामध्ये माझी मैना गावाकडे राहिली, संत जनाबाईंचे प्रबोधनपर गीत, भारुड इत्यादी गोष्टी त्यांनी सादरीकरण केल्या व विद्यार्थ्यांना उत्तम रीतीने मार्गदर्शन केले. प्रा. महेश थोरात या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते त्यांनी देखील विद्यार्थ्यांना योग्य रीतीने मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, संचालक .प्रशांत घोडविंदे उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, व्यवस्थापन शाखाप्रमुख. उल्हास गायकर,प्रा. निकिता घोडविंदे, प्रा. सचिन कांबळे, प्रा. शैलेजा मिश्रा यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे एकत्रित सहभागाने हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# देशभक्तीपर कार्यक्रमांनी केडीएमसी शाळांत प्रजासत्ताक दिन साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने दिनांक ०८ /१२/२०२५ रोजी जारी केलेल्या परीपत्रकानुसार महानगरपालिका क्षेत्रांतर्गत असलेल्या महानगरपालिकेच्या शाळांसह सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या ५२४ शाळांमध्ये भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी, २०२६ साजरा करताना, सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या संगीतबद्ध कवायतीच्या सामुहीक प्रदर्शनासह मुलांची भाषणे, देशभक्तीपर सामुहीक गीतांच्या कार्यक्रमांसह विविध भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त सीआरसी स्तरावर व शाळा स्तरावर विद्यार्थ्यांची संगीतबद्ध सामुहिक कवायत घेण्यात आली. सदरील कवायत सादरीकरण करताना




विद्यार्थ्यांनी रंगीत झेंडे, डंबेल्स, घुंगरुकाठी, लेझीम यांचा एकत्रित वापर प्रथमतः करुन रोमहर्षक सामुहिक कवायतींचे उत्कृष्ट प्रदर्शन विविध शाळांमध्ये केले.

यावेळी प्रजासत्ताक दिनानिमित्त कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या शाळांमध्ये सीआरसी स्तरावर घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विजयी स्पर्धकांना बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी भारत बोरनारे, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, समग्र शिक्षा अभियानाच्या प्रमुख सौ जाधव, सर्व विषयतज्ञ यांनी महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळांना प्रजासत्ताक दिनी भेटी देऊन, प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध सामुहिक कवायती, कार्यक्रमांची पाहणी करीत शाळांचे संस्थाप्रमुख, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व पालक यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि संगीतबध्द कवायतींसह विविध उपक्रम शाळेमध्ये व सीआरसी स्तरावर यशस्वीरित्या संपन्न केल्याबददल कौतुक केले .

# खाजगी जमिनीवरील 'वने' संज्ञेवर शासन मौन | शहापुरात एल्गार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भातसानगर :** ठाणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीवरील' वने ' ही नोंद कायमची काढून टाकण्यात ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे 7 नोव्हेंबरला दिलेल्या निकालामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारने तत्काळ या निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे.

यासंदर्भात सह्याद्री परिसर सेवा संस्था ठाणे यांच्या वतीने शहापूर येथील कुणबी भवनात शेतकऱ्यांसाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी चंद्रकांत शेळके,किशोर ठाकरे, विधीज्ञ राहुल ठाकरे, किसन तारमळे, जितेश विशे,वसंत भेरे,संतोष विशे,अनिल निचिते,डॉ.प्रकाश भांगरथ,व तालुक्यातील शेकडो



बाधित शेतकरी उपस्थित होते. यावेळी सर्व शेतकऱ्यांनी आपले जुने सातबारा व नोंदी सह सर्व प्रकरणे तात्काळ तहसीलदार व प्रांत अधिकाऱ्यांकडे दाखल करावीत असे आवाहन करण्यात आले. जर या सर्व बाधित शेतकऱ्यांची वने ही संज्ञा लवकरच शासनाने काढली नाही तर त्या संदर्भात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीवर सरकारने वने हा शेरा लावला होता. परिणामी त्या जमिनीच्या मालकांना आपली जमीन विक्री, कर्ज किंवा बांधकामासाठी वापरणे शक्य नव्हते. ठाणे जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांनी व निवृत्त अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन याबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या खटल्यात न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निकाल रद्द करत खाजगी जंगल घोषित करण्याचे आदेश अवैद्य ठरवले आहेत.आणि महसूल नोंदीतून ' वन ' ही संज्ञा काढून टाकण्याचे आदेश राज्य सरकारला दिले. सरकारला पुन्हा

**न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर शासनाने तात्काळ निर्णय घेणे गरजेचे आहे. जर ' वने 'संज्ञा काढण्याचा निर्णय शासनाने घेतला नाही तर जनआंदोलन उभे केले जाईल**
**- चंद्रकांत शेळके**

प्रक्रिया करायची असल्यास ती संपूर्ण कायदेशीर मार्गाने करावी असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

वने संज्ञेमुळे शेतकऱ्यांना कर्ज विक्री किंवा इतर वापरासाठी जमीन उपयोगात आणता येत नव्हती. त्यामुळे महाराष्ट्रातील सुमारे दोन लाख शेतकरी हक्काची जमीन राहणार की जाणार या प्रश्नाने सतत हवालदिल होत होते. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय त्यांच्या हक्काच्या लढ्याला न्याय देणारा ठरला आहे. भारतीय वन कायद्यानुसार राज्य सरकारला

**या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मान्य केला आहे केवळ नोटीस दिली नाही म्हणजे ती जमीन वन ठरत नाही हा निर्णय गरीब दारिद्र्य पिचलेल्या शेतकरी बांधवांसाठी आशेचा किरण आहे. मात्र तरीही महाराष्ट्र शासनाने अजूनही यावरती कुठलाही निर्णय घेतला नाही. त्यामुळे शासनाने यासंदर्भात वने ही संज्ञा रद्द करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अन्यथा तीव्र आंदोलन उभारले जाईल.**
**- किशोर ठाकरे सेवानिवृत्त वनाधिकारी व याचिकाकर्ते.**

खाजगी मालकीच्या जमिनीवर वनसंवर्धनासाठी अधिसूचना काढण्याचा अधिकार आहे .याच कलमाचा आधार घेत 1950 ते 1965 दरम्यान राज्यातील सुमारे अडीच लाख हेक्टर खाजगी जमिनीवर वन अशी नोंद करण्यात आली होती. या नोटिसा बहुतांश केवळ कागदोपत्री होत्या. प्रत्यक्षात जमिनीच्या मालकांना त्या कधीच बजावण्यात आल्या नाहीत .मूळ जमीनदारांचे वारसदार किंवा विकत घेणारे मालकही अशा नोटिसा कधीच पाहिल्या नाहीत असे याचिकेत नमूद केले होते.

ठाणे रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यातील शेतकरी आपल्या खाजगी जमिनीवरील वृक्षसंपदा जपतात ही झाडे विकून मिळणारे उत्पन्नातून ते कुटुंबीयांच्या गरजा भागवतात. लग्न सोहळे करतात आणि पुन्हा नव्या झाडांची लागवड करतात सरकारने लावलेला वन शेरा त्यांच्या या उपजीविकेवर थेट गदा आणणारा ठरला होता.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024